DAY — **20** SEAT NUMBER

2026	III	09	1500	J-277	(M)

HISTORY (38)

Time : 3 Hrs. (11 Pages) Max. Marks : 80

सूचना : *(१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.*

(२) उजव्या बाजूस गुण दर्शविलेले आहेत.

(३) उत्तरपत्रिकेमध्ये आकृत्या पेनानेच काढाव्यात.

(४) प्रत्येक प्रश्नाचे उत्तर नवीन पानांवर सुरू करावे.

प्र. १. **(अ)** दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा : (६) **[१०]**

(१) इ.स. १६०९ मध्ये -------- ने अधिक सुधारित दुर्बीण तयार केली.

(अ) जॉन के

(ब) कोपर्निकस

(क) गॅलिलिओ

(ड) केपलर

(२) डचांनी ------- येथे त्यांची पहिली वसाहत स्थापन केली.

(अ) चेन्नई

(ब) मच्छलीपट्टण

(क) कारिकल

(ड) पाँडिचेरी

(३) इ.स. १८२४ मध्ये ------- यांनी पुण्याजवळील भांबुर्डे येथील सरकारी तिजोरी ताब्यात घेतली.

(अ) संताजी भोसले

(ब) हरिया भिल्ल

(क) उमाजी नाईक

(ड) त्रिंबकजी डेंगळे

(४) भारतामध्ये ------- यांच्या प्रयत्नातून अनेक संस्थाने विलीन झाली.

(अ) जयंतराव टिळक

(ब) सरदार वल्लभभाई पटेल

(क) पंडित जवाहरलाल नेहरू

(ड) डॉ. टी.बी. कुन्हा

(५) १९३५ मध्ये ------- भारतातून वेगळा करण्यात आला.

(अ) म्यानमार

(ब) श्रीलंका

(क) मालदीव

(ड) इराण

SEAT NUMBER

(६) १७७६ मध्ये जगात सर्वप्रथम ------- या देशात माहितीचा कायदा लागू झाला.

(अ) स्वीडन

(ब) फ्रान्स

(क) इंग्लंड

(ड) भारत

(ब) पुढील प्रत्येक संचामधील 'ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा : (४)

(१)

'अ' गट		'ब' गट
(i) थॉमस जेफरसन	—	अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा
(ii) लॉर्ड कॉर्नवॉलिस	—	इंग्रजांचा सेनानी
(iii) राजा थिबा	—	सिक्कीम
(iv) लॉर्ड वॉरन हेस्टिंग्ज	—	भूटानशी मैत्रीचे संबंध

(२)

'अ' गट		'ब' गट
(i) सदाशिवरावभाऊ	—	पानिपतच्या तिसऱ्या युद्धात मराठ्यांचा सेनापती
(ii) अहमदशहा अब्दाली	—	नेपाळचा राजा
(iii) इब्राहीमखान गारदी	—	मराठ्यांच्या तोफखान्याचा प्रमुख
(iv) हेन्री रेव्हिंग्टन	—	इंग्रज अधिकारी

(३)

'अ' गट		'ब' गट
(i) ब्राह्मो समाज	—	राजा राममोहन रॉय
(ii) सत्यशोधक समाज	—	महात्मा जोतीराव फुले
(iii) परमहंस सभा	—	महर्षी विठ्ठल रामजी शिंदे
(iv) रामकृष्ण मिशन	—	स्वामी विवेकानंद

(४) ‘अ’ गट — ‘ब’ गट

‘अ’ गट		‘ब’ गट
(i) डॉ. सुकार्नो	—	भारत
(ii) क्वामे नख्रुमा	—	घाना
(iii) गमाल अब्दुल नासेर	—	इजिप्त
(iv) मार्शल टिटो	—	युगोस्लाव्हिया

प्र. २. **(अ)** ऐतिहासिक ठिकाण, व्यक्ती, घटना या संबंधीची नावे लिहा : (४) **[८]**

(१) भारतात सर्वप्रथम आलेले युरोपीय –

(२) कोल्हापूर संस्थानात मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा करणारे –

(३) सीएटो संघटनेच्या मुख्यालयाचे ठिकाण –

(४) भारतरत्न हा सर्वोच्च सन्मान मिळवणारा खेळाडू –

(ब) दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधाने पूर्ण करा : (४)

(१) युरोपात १५व्या शतकात व्यापारी क्रांती घडून आली. कारण –

(अ) युरोपीय दर्यावर्दींनी नव्या जलमार्गाचा शोध लावल्यामुळे व्यापार पद्धतीत बदल झाला.

(ब) अमेरिकेत वसाहती निर्माण झाल्या.

(क) इंग्लंडमध्ये राजकीय क्रांती झाली.

(ड) अमेरिकेत स्वातंत्र्याचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला.

(२) छत्रपती शिवाजी महाराजांनी आरमार दल उभारले होते. कारण –

(अ) इंग्रजांच्या व्यापारावर जकात बसविण्यासाठी.

(ब) स्थानिक मिठाच्या व्यापाराला संरक्षण देण्यासाठी.

(क) परकियांचे छुपे हेतू ओळखून त्यांची भारतातील घुसखोरी थांबविण्यासाठी.

(ड) जलदुर्ग उभारण्यासाठी.

(३) राजा राममोहन रॉय यांनी सती प्रथे विरुद्ध एक पत्र इंग्रजी भाषेत प्रसिद्ध केले. कारण –

(अ) स्त्रियांच्या पडदा पद्धतीला उत्तेजन देणे.

(ब) त्यांच्या वहिनीला सती जावे लागले या घटनेचा त्यांच्या मनावर खोलवर परिणाम झाला.

(क) बंगाली भाषेतील पहिले साप्ताहिक सुरू केले.

(ड) 'आत्मीय सभे'ची स्थापना केली.

(४) दुसऱ्या महायुद्धानंतर शीतयुद्धाला सुरवात झाली. कारण –

(अ) अमेरिकेने 'मार्शल प्लॅन' योजनेला विरोध केला.

(ब) सोव्हिएट रशियाने साम्यवादी विचारसरणी व अमेरिकेने भांडवलशाही विचारसरणी स्वीकारली.

(क) इंग्लंडने सोव्हिएट रशियाला पाठिंबा दिला.

(ड) अमेरिका आणि सोव्हिएट रशियाने देतांत (Detente) प्रक्रिया चालू ठेवण्याची भूमिका घेतली.

प्र. ३. **(अ)** पुढील नकाशाचे निरीक्षण करून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : (५) **[१३]**

(१) बोस्टन शहर कोणत्या वसाहतीमध्ये आहे?

(२) अमेरिकन वसाहती कोणत्या महासागराच्या किनाऱ्यावर आहेत?

(३) व्हर्जिनिया या वसाहतीमधील शहर कोणते?

(४) न्यू बर्न हे शहर कोणत्या वसाहतीमध्ये आहे?

(५) वरील नकाशा कोणत्या विषयाशी संबंधित आहे?

SEAT NUMBER

(ब) दिलेली संकल्पना चित्रे पूर्ण करा (कोणतेही चार) : (८)

(१) खालील तक्ता पूर्ण करा –

शोधक	भौगोलिक शोध
अमेरिगो वेस्पुसी	----------
----------	नायजर नदीचा प्रवाह
मार्को पोलो	----------
----------	कालिकत (कोझीकोडे) बंदरात पोचलेला दर्यावर्दी

(२) संकल्पना चित्र पूर्ण करा :



(३) संकल्पना चित्र पूर्ण करा :



(४) संकल्पना चित्र पूर्ण करा :



(५) संकल्पना चित्र पूर्ण करा :



(६) संकल्पना चित्र पूर्ण करा :



SEAT NUMBER | | | | | | |

प्र. ४. **(अ)** संक्षिप्त टिपा लिहा (कोणत्याही तीन) : (६) **[१५]**

(१) धर्मयुद्धाचे परिणाम

(२) आझाद हिंद सेना

(३) डॉ. द्वारकानाथ कोटणीस

(४) अटलांटिक सनद

(५) स्पीड पोस्ट

(ब) पुढील विधाने सकारण स्पष्ट करा (कोणतीही तीन) : (९)

(१) औद्योगिक क्रांतीमुळे वसाहतवादाला चालना मिळाली.

(२) पोर्तुगिजांशी लढा देणे भारतीय सत्तांना अवघड झाले होते.

(३) १९२०ला महात्मा गांधींनी असहकार आंदोलन सुरू केले.

(४) पुदुच्चेरी हा केंद्रशासित प्रदेश बनला.

(५) 'राहीबाई पोपेरे' ह्या बीजमाता या नावाने ओळखल्या जातात.

प्र. ५. **तुमचे मत नोंदवा (कोणतेही तीन) :** **[९]**

(१) भारतीय समाज सुधारकांना सामाजिक व धार्मिक सुधारणांची आवश्यकता वाटली.

(२) स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय नेत्यांसमोर संस्थानांच्या विलीनीकरणाचा प्रश्न मोठा होता.

(३) दुसऱ्या महायुद्धात जपानने शरणागती पत्करली.

(४) संरक्षण विषयक सराव दोन राष्ट्रांनी एकत्र करणे दोन्ही राष्ट्रांसाठी फायदेशीर असते.

(५) सर्व शिक्षा अभियान शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी भारतात उपयुक्त ठरत आहे.

प्र. ६. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन) : [१०]

(१) युरोपातील औद्योगिक क्रांतीची कारणे व परिणाम स्पष्ट करा.

(२) भारतातील सर्वात प्रभावी मराठी सत्ता संपुष्टात आली.

(३) अलिप्ततावादाचा अर्थ आणि त्याची धोरणे स्पष्ट करा.

प्र. ७. खालील प्रश्नांची दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही तीन) : [१५]

(१) भारतातील पोर्तुगिजांच्या साम्राज्य विस्ताराचे धोरण स्पष्ट करा :

(अ) वसाहतीची स्थापना

(ब) प्रशासन व्यवस्था

(क) धार्मिक असहिष्णुतेचे धोरण

(२) १८५७च्या स्वातंत्र्य लढ्याची कारणे लिहा :

(अ) ब्रिटीश फौजेतील भारतीय सैन्याचा असंतोष

(ब) स्थानिक संस्थानिकांमध्ये असंतोष

(क) ब्रिटिशांचा सहानुभूती शून्य दृष्टिकोन

(३) पहिल्या महायुद्धाची (१९१४-१९१८) माहिती लिहा :

(अ) पहिल्या महायुद्धाची कारणे

(ब) पहिल्या महायुद्धाचे तात्कालिक कारण

(क) राष्ट्रसंघाची स्थापना

(४) आफ्रिका खंडातील निर्वसाहतीकरणाची माहिती लिहा :

(अ) कारणे

(ब) बांडुंग परिषद

(क) आफ्रिकी ऐक्य कल्पना

SEAT NUMBER | | | | | | | |

(५) भारतातील राज्यांच्या पुनर्रचनेची माहिती लिहा :

(अ) झारखंड

(ब) तेलंगणा

(क) जम्मू-काश्मीर व लडाख

◆◆◆